


सायं. दैनिक
बीड
# प्रारंभ
Email-prarambh2023@gmail.com
• संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे •




बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ५ वे ■ अंक ९० मंगळवार दि. २७ मे २०२५ RNI MAHMAR/2021/81481 किंमत ३ रुपये ■पाने-४

# मृत्यूच्या दाढेतून बाहेर आले, पण नियतीने ठरल्याप्रमाणे शेवट केला अन् गढी पूल सहा जणांच्या रक्ताने माखला

## गढीजवळ कंटेनरच्या धडकेत सहा जण जागीच ठार तर तीन गंभीर जखमी

प्रारंभ । वृत्तसेवा

गेवराई : बीड जिल्ह्यासाठी आजची म्हणजेच मंगळवारची (२७ मे) सकाळ एका अतिशय दुर्दैवी बातमीने उजाडली आहे. यात बीड जिल्ह्यातून धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गढी पुलावर एक भीषण अपघाताची घटना घडली आहे. नियतीच्या या खेळात एका अपघातामधून बचावलेल्या सहा जणांना दुसऱ्याच क्षणात भरधाव ट्रकनं बेदरकारपणे अक्षरक्ष: चिरडलं आहे. त्यामुळे एकदा मृत्यूच्या दाढेतून बाहेर आलेल्या ६ मित्रांचा नियतीने अखेर ठरल्याप्रमाणेच शेवट केला. या दुर्दैवी घटनेने संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मात्र सहा जणांच्या अपघाती निधनाच्या बातमीने गेवराईवर शोककळा पसरली आहे.



### अशी आहेत मृतकांची नावे

बाळू आतकरे, मनोज करांडे, कृष्णा जाधव, दीपक सरोया, भागवत परळकर आणि सचिन ननवरे यांचा मृत्यू झाला असून एका जण गंभीर जखमी झालाय. तसचे जखमी व्यक्तीवर सध्या उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थाळ गाठत पुढील कारवाई सुरू केली आहे. या घटनेत कारचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. तर ट्रक चालक ट्रकसह घटनास्थळावरुन फरार झाला आहे. त्यामुळे पोलीस या ट्रक चालकाचाही शोध घेत आहे. मात्र सहा जणांच्या अपघाती निधनाने गेवराईवर शोककळा पसरली आहे.

### ....अन् इथेच नियतीने घात केला, क्षणात होत्याचं नव्हतं झालं!

पुढे आलेल्या माहिती नुसार, गेवराई शहरानजीक असणाऱ्या गढी पुलावरुन एका एसयूव्ही कार मधून सहा जण प्रवास करत होते. रात्रीच्या वेळी रस्ता रिकामा असल्याने गाडी भरधाव वेगाने जात होती. मात्र अचानक कारवरील नियंत्रण सुटलं आणि कार डिव्हायडरला जाऊन धडकली. यावेळी कारमधील काहींना किरकोळ मार बसला. मात्र कारचे काही प्रमाणात नुकसान झाले. अशातच डिव्हायडरमध्ये अडकलेली गाडी बाहेर काढण्यासाठी गाडीतील सर्वजण बाहेर आले आणि इथेच नियतीने घात केला. या दरम्यान महामार्गावरून जाणाऱ्या एका भरधाव ट्रकने या सहा जणांना जोरदार धडक देत अक्षरक्ष: चिरडत नेलं आणि यात त्या सहाही जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात मध्यरात्रीच्या सुमारास झाल्याचे समोर आले आहे.

# आर.टी.देशमुख यांचे अपघातात निधन



बीड । प्रतिनिधी

माजलगावचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचा सोमवारी रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. ते सोलापूरवरुन ते लातूरकडे निघाले होते. त्यांचा अंगरक्षक आणि वाहनचालक याच्याबरोबर ते सोलापूरहून लातूरकडे निघाले होते. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील बेलकुंड याठिकाणी असलेल्या उड्डाणपुलावर वेगात असलेल्या त्यांचे वाहन चार पलटी खाऊन सर्व्हिस रोडवर येऊन पडले.



उड्डाणपुलावरील उतारावर गाडी निघाली असता पावसाचे पाणी उतारावर वाहत होते. हे पाणी गाडीच्या समोरील काचेवर आल्याने वाहन चालकाला अंदाज आला नाही. ब्रेक लावण्याच्या घाईत आर.टी. देशमुखांची गाडी ▶▶ पान २ वर...

### जिजा भाऊंच्या अकाली निधनाने एक मार्गदर्शक नेतृत्वास मुकलो - धनंजय मुंडे

माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते आर टी जिजा देशमुख यांच्या निधनाने एक मार्गदर्शक नेतृत्वास आपण मुकलो आहोत. त्यांच्या अकाली अपघाती निधनाने बीड जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली असल्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.धनंजय मुंडे यांनी आर. टी. देशमुख यांच्या अपघाती निधनाबद्दल ट्विट करून ▶▶ पान २ वर...

आर. टी. जिजा यांचे अपघाती निधन झाल्याचे वृत्त हे अत्यंत वेदनादायी असून भाजपचे जिल्हाध्यक्ष ते माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी असा त्यांचा प्रवास होता.अतिशय चांगला माणूस म्हणून त्यांची ओळख होती.सगळ्यांशी मिळून मिसळून वागणारा,मितभाषी असलेला, मनामध्ये कधीही कुणाविषयी आकस न बाळगणारा आणि कायम कार्यकर्त्यांवर प्रेम करणार व्यक्तिमत्त्व म्हणून आर.टी.जिजा होते.त्यांच्या निधनाने एक चांगला मित्र गमावल्याचे शल्य कायम राहील.

आ.सुरेश धस
आष्टी/पाटोदा/शिरूर(का.)

### आर.टी. देशमुखांच्या निधनाने बीड जिल्ह्यात शोकाकुल वातावरण

आरटी देशमुख हे २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत माजलगाव मतदारसंघातून भाजपच्या तिकीटावर आमदार बनले होते. ते दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचे कट्टर समर्थक म्हणून बीड जिल्ह्यात परिचित होते. त्यांच्या निधनाचे वृत्त येताच बीड जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. देशमुखांच्या निधनाचे वृत्त कळताच मंत्री पंकजा मुंडे यांनी आपले सर्व कार्यक्रम रद्द करुन लातूर गाठले. तसेच देशमुख कुटुंबीयांशी फोनवरुन संवादही साधला.

## वर्षानुवर्षे एकाच तालुक्यात कार्यरत तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या शासन निर्णयानुसार बदल्या करा -अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

महसूल प्रशासनातील तलाठी व मंडळ अधिकारी हे स्थानिक पातळीवर प्रशासनाचा कणा मानले जातात. मात्र, बीड जिल्ह्यातील अनेक तलाठी व मंडळ अधिकारी १० ते १५ वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्यामुळे प्रशासनात पारदर्शकतेचा अभाव दिसून येत आहे. त्यामुळे महसूल कामकाजात गैरव्यवहार, भ्रष्टाचार वाढल्याची तक्रारी सातत्याने समोर येत आहेत.



शासनाने तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी ३ ते ५ वर्षांचा कालावधी निश्चित केला असून, यानुसार बदल्या करणे आवश्यक असतानाही बीड जिल्ह्यातील अनेक अधिकारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. उपविभागीय कार्यालयातील आस्थापना विभागातून या बदल्या केल्या जात होत्या, त्यामध्ये आर्थिक व्यवहार व राजकीय हस्तक्षेपाचा आरोप वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे.

शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून शासकीय कार्यालये व निवासस्थाने उभारली असतानाही अनेक तलाठी व मंडळ अधिकारी शहरातील खासगी इमारतींमध्ये कार्यालये थाटून काम करत आहेत. यामुळे सार्वजनिक पैशांची नासाडी होत असून, सामान्य जनतेस कार्यालयीन कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरी, बीडचे मा. जिल्हाधिकारी यांनी याची गंभीर दखल घेऊन शासन निर्णयाच्या अधीन राहून वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी किंवा एकाच तालुक्यात कार्यरत असलेल्या तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या तात्काळ बदल्या कराव्यात, शासकीय कार्यालये व निवासस्थाने वापरणे बंधनकारक करावे, तसेच आस्थापना विभागातील गेल्या १५ वर्षांतील बदल्यांची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे.

## मारफळा येथे वीजेचा शॉक लागून दोघांचा मृत्यू

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मारफळा येथे उसाच्या शेतामध्ये खत देण्याचे काम करत असलेल्या बाप लेकाला विद्युत तारेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अभिमान कबले आणि ज्ञानेश्वर कबले असं पिता-पुत्राचं नाव आहे. दोघेजण आपल्या शेतात काम करत असताना त्या ठिकाणी विद्युत तार खाली पडलेली होती.



त्यात प्रवाह असल्याने दोघांनाही त्याचा शॉक लागला. दोघांना बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. महावितरणच्या गलथानपणाचा फटका आता या शेतकऱ्यांच्या जीवावर बेतला असून जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी गावकऱ्यांमधून केली जात आहे.

## बीडमध्ये तरुणाचे अपहरण, झाडाला बांधून मारहाण; उपचारादरम्यान मृत्यू

बीड । प्रतिनिधी

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी आणि मारहाणीच्या घटनांचे व्हायरल होणारे व्हिडिओ चर्चेचा आणि गंभीर विषय बनला आहे. बीड पोलीस प्रशासनानेही व्हायरल व्हिडिओची दखल घेत कारवाई केली आहे. मात्र, अद्यापही बीड जिल्ह्यातील अशा घटना कमी होताना दिसत नाहीत. केज तालुक्यात तरुणाचे अपहरण करत झाडाला बांधून मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली होती. मात्र, मारहाण करण्यात आलेल्या तरुणाचा रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाल्याची माहिती आहे. अनैतिक संबंधाचे कारणातून ही मारहाण झाली असल्याची प्राथमिक माहिती आहे. याप्रकरणी, युसूफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून ७ आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत



बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील भाटूंबा येथे अनैतिक संबंधातून अण्णा उर्फ ज्ञानेश्वर धपाटे यांचे अपहरण करत झाडाला बांधून मारहाण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली होती. या मारहाणीमध्ये गंभीर जखमी झालेल्या ज्ञानेश्वर धपाटे याला अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. आता या प्रकरणात युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी सात आरोपींना ताब्यात घेतले आहे.

हॉटेलचालकास मारहाण, व्हिडिओ व्हायरल

बीड-अहिल्यानगर महामार्गावरील शिवमुद्रा हॉटेल चालकाला ५ ते ७ जणांच्या टोळक्याकडून बेदम मारहाण झाली आहे. मारहाणीची घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली असून अद्याप पोलीस ठाण्यातही तक्रार दाखल नाही. सीसीटीव्ही फुटेजमध्ये लाकडी दांडे आणि बेल्टने ही बेदम मारहाण होताना दिसत आहे. अविनाश साबळे, नितीन साबळे आणि अमोल लोखंडे अशी मारहाण झालेल्यांची नावे आहेत. जखमींवर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मारहाण नेमक्या कोणत्या कारणाने झाली? याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. मात्र, या घटनेतून जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे.

## पात्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करा बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा

### डॉ. ज्योती मेटे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून महाराष्ट्रामध्ये दाखल झाला असून यावर्षी पर्जन्यमान सरासरी पेक्षा जास्त आहे ही बाब अतिशय समाधानकारक आहे. पात्र शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ मध्ये शंभर टक्के पीक कर्ज वाटप होणे आवश्यक आहे. जानेवारी ते एप्रिल २०२५ अखेर महाराष्ट्रात झालेल्या शेतकरी आत्महत्येचा विचार करता महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात झालेल्या आहेत ही बाब क्लेशकारक आहे. कर्जबाजारीपणा, शेतमालाला हमीभाव नसणे, हवामानाचा फटका या बाबी शेतकरी आत्महत्यास कारणीभूत ठरतात हे विचारात घेता जिल्ह्यातील पतआराखड्यानुसार खरीप हंगाम २०२५ करिता रुपये १५६६ कोटी इष्टांक पूर्तते करिता डी.एल.सी.सी मध्ये नियमित आढावा घेऊन इष्टांक पूर्तेते बाबत जिल्हा अग्रणी बँकेस सूचित करण्यात यावे आणि पात्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करून बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा या संदर्भात शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली.



बीड जिल्ह्यामध्ये खरीप हंगाम २०२४ ▶▶ पान २ वर...

## डॉ.योगेश क्षीरसागरांच्या पुढाकारातून बीड शहरातील स्वच्छता मोहिमेला गती

बीड । प्रतिनिधी

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील आरोग्य व स्वच्छतेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली माजी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांची भेट घेऊन शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम गतीने राबवण्याची मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने सोमवारपासून ▶▶ पान २ वर...





### बीड शहरवासीयांचे सहकार्य महत्त्वाचे-डॉ.योगेश क्षीरसागर

या मोहिमेमुळे पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांना आळा घालण्यास मदत होणार असून, शहर स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी नागरिकांचेही सहकार्य मोलाचे आहे, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

### सतत देखरेख, आढावा घेतला जाणार

स्वच्छता मोहिमेचा नियमित आढावा घेण्यात येणार असून प्रत्येक वॉर्डातील कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या मोहिमेला अधिक प्रभावी करण्यासाठी नागरिकांच्या सूचना व सहकार्य महत्त्वाचे ठरणार आहे.

# भारताची गरूडझेप

भारत आता चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे आणि ही मोदी सरकारच्या आणि देशाच्या १४० कोटी भारतीयांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. भारत पूर्वी हत्ती आणि सापांचा देश म्हणून ओळखला जात असे. आता त्याचे रूपांतर एका विकसित नव्हे पण विकासाच्या मार्गावर असलेल्या चौथ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेत होत आहे ही आपल्या सर्वांसाठी निश्चितच आनंदाची आणि मुजरा करण्यायोग्य बाब आहे. नीती आयोगाचे सीईओ बीव्हीआर सुब्रमण्यम यांनी ही माहिती नुकतीच दिली आणि भारतापुढे आता चीन, अमेरिका आणि जर्मनी हेच तीन देश आहेत अशीही त्यांनी माहिती दिली आणि ही माहिती केवळ भारतीयाने दिली नाही तर भारतद्वेष्ट्या अशा आयएमएफने दिली आहे. त्यामुळे ही आकडेवारी विश्वसनीय आहे. कारण तेथे तर कुणी मोदी भक्त नाही तर उलट मोदींचा आणि भारताचा द्वेषच करणारे आहेत. भारत आता जपानला मागे टाकून चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे हे निःसंशय गौरवास्पद आहे. हे श्रेय जसे मोदी यांचे आहे तसेच ते १४० कोटी भारतीयांचे आहे, या देशातील प्रत्येक नागरिकाचे आहे.

भारत आता जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे आणि त्याला कारण ठरली आहे ती, भारतातील भू राजकीय स्थिती आणि अत्यंत अनुकूल आर्थिक वातावरण. ४ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था आज भारताची आहे आणि हे स्थित्यंतर जबरदस्त आहे, तसेच ते देशाची कहाणी सांगणारी आहे. आयएमएफच्या आकडेवारीनुसार भारत आज जपानपेक्षा मोठा आहे आणि भारताच्या पुढे आज फक्त जर्मनी, अमेरिका आणि चीन आहेत. पण हे यश भारताला सहजसाध्य मिळालेले नाही. अर्थव्यवस्थेचा आकार मोजला जातो तो जीडीपीच्या माध्यमातून आणि तोच जपानपेक्षा काहीसा जास्त आहे. आयएमएफच्या अहवालात म्हटले होते की, विकासाचा आऊटलुक २०२५ मध्ये ६.२ टक्के होता. त्याला खासगी सहभाग आणि उपभोगाने विशेषतः ग्रामीण भागात चांगल्या मागणीचा हातभार लागला आहे. त्याशिवाय भारताचे बाजारपेठीय पोटेन्शियल आणि व्यापक होत चाललेले आर्थिक क्षेत्र, वाढते जागतिक व्यापार आणि गुंतवणूक फ्लोमध्ये सहभाग यामुळे भारताची अर्थव्यवस्था आज या मुक्कामाला पोहोचली आहे. पंतप्रधान मोदी यांनी २०१४ मध्ये सत्ता हस्तगत केली. तेव्हापासून भाजपाच सत्तेत आहे आणि त्या काळापासूनच देशाची प्रगती अखंड आणि अविरत सुरू आहे. काँग्रेसच्या काळात गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील विश्वास उडाला होता आणि भ्रष्टाराच्या अनेक प्रकरणामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास कमजोर झाला होता. पण मोदी सत्तेवर आल्यावर त्यानी 'न खाने दूंगा ना खाऊंगा...' अशी घोषणा दिली आणि त्यानुसार एकही भ्रष्टाचाराची तक्रार नोंदवण्यात आलेली नाही. अन्यथा काँग्रेसच्या काळात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे चर्चेत होती आणि रोज वृत्तपत्रांना नवीन मसाला पुरवला जात होता. पण आज ती परिस्थिती राहिलेली नाही. हा गुणात्मक बदल मोदी आल्यापासून झाला आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास परत आला आहे आणि त्यामुळे भारत आज चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे. पण हे काम सोपे नव्हते. त्यासाठी मोदी यांची विलक्षण जिद्द आणि निर्धार तसेच तमाम भारतीयांची मोदी यांना मिळालेली साथ ही कारणे होती. केवळ आर्थिक विकासाच्या आकडेवारीवर विचार केला तरी मोदी सरकारची कामगिरी या दहा वर्षांत प्रभावी राहिली आहे. अर्थात मोदी यांची ही कामगिरी असामान्य असली तरीही पुरेशी प्रशंसा करण्यालायक मात्र नाही हे कबूल करणे भाग आहे. जरी मोदी सरकारची आर्थिक कामगिरी जबरदस्त असली तरीही कोट्यवधी भारतीय गरीबच आहेत. तसेच नोकऱ्यांचे भयावह वास्तव आहे. त्यामुळे तरुणांना रोजगाराचा लाभ होत नाही तोपर्यंत भारत सुखी आहे असे म्हणवत नाही.अर्थव्यवस्था जरी समाधानकारक असली तरीही काही बॉटलनेक्स आहेत. त्यात सर्वप्रथम आहे तो गरिबीचा. गरिबी आणि असमानतेचे अंदाज याबाबतचे वास्तविक चित्र समोर येत नाही. मोदी यांनी रस्ते आणि पायाभूत सुविधा उभारण्यावर जोर दिला आहे आणि त्यामुळे आपल्याला देशात आज अनेक ठिकाणी चांगले रस्ते आणि पूल तसेच सेतू बांधलेले दिसून येतात. पण त्याबरोबरच डिजिटल प्रणालीचा वापर व्हावा तितक्या प्रमाणात वाढलेला दिसत नाही, यावर मोदींनी विचार केला पाहिजे. कारण चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणायचे आणि व्यवहार तसेच पूर्वीच्या पद्धतीने करत राहायचे हे चांगले नाही. कोणत्याही देशाला ते शोभण्यासारखे नाही. मोदी यांनी शौचालये बांधण्याच्या योजना आणल्या आणि देश हागणदारी मुक्त केला. पण अजूनही ग्रामीण भागात काही ठिकाणी ही स्थिती आहेच आणि शेवटी अमर्त्य सेन यांनी म्हटल्याप्रमाणे शेवटच्या पायरीवर उभ्या असलेल्या माणसाला जोपर्यंत विकासाची फळे मिळणार नाहीत तोपर्यंत त्या विकासाची फळे शेवटपर्यंत पोहोचली असे म्हणता येणार नाहीत. त्याबाबतीत मोदी यांना अजून बरेच कार्य करायचे आहे. पण मोदी हे कार्य करून दाखवतील यात अजिबात शंका नाही. भारताच्या विकासाने झेप घेतली आहे पण महामारीचा काळ आणि त्यादरम्यान झालेले धान्य वितरण वेगाने झाले. ही निःसंशय स्पृहणीय बाब होती, पण त्याच काळात सरकारच्या अन्न बिलात पाच पट वाढ झाली.मोदींच्या या यशात इतरही काही क्षेत्रांचा वाटा आहे. ती क्षेत्रे म्हटली तर विजेचे प्रमाण आणि तिचा वाढता वापर तसेच डीबीटीच्या माध्यमातून गरिबांना रोख रकमेचे हस्तांतरण करण्यात येत असल्यामुळे त्यातील भ्रष्टाचारच कमी झाला हेही मोदी यांच्या कार्याचे यशच म्हणावे लागेल... मोदी सरकारने भारताची अर्थव्यवस्था आज वाढवली आहे इतकी ती चौथ्या क्रमांकाची बनवली आहे. पण अजूनही भारतातील अकुशल आणि गरीब वर्ग मोठ्या प्रमाणात बेरोजगार आहे आणि त्याच्यासाठी मोदी सरकार नोकऱ्या उपलब्ध करू शकलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. अजूनही भारतातील बहुसंख्य वर्ग शेतीवरच अवलंबून आहे. ही आव्हाने आहेतच पण मोदी यांचे यश निश्चित अभूतपूर्व आहे.

# पात्र घरकुलधारकांना प्रत्येकी पाच ब्रास वाळू मोफत देण्यात येणार –आ.नारायण कुचे

अंबड । प्रतिनिधी

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय दिनांक ८ एप्रिल २०२५ व ३० एप्रिल २०२५ अन्वये जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तालुक्यातील पात्र घरकुलधारकांना पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे अशी माहिती २६मे रोजी अंबड तहशील कार्यालयामध्ये बदनापूर अंबड मतदार संघाचे आमदार नारायण कुचे यांनी बैठकीमध्ये माहिती दिली. या बैठकीमध्ये तहसीलदार विजय चव्हाण अंबड नगरपरिषद चे मुख्याधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थिती होती. यावेळी बोलताना श्री आमदार नारायण कुचे



म्हणाले की,

पात्र लाभार्थी यांनी तलाठी ग्रामसेवक यांच्यामार्फत किंवा स्वतःही स्वतःचा आधार क्रमांक मोबाईल क्रमांक व घरकुल मंजुरीची यादी चा क्रमांक अपलोड केल्यानंतर सदरील पात्र लाभार्थ्यांना तहसीलमार्फत मोफत ई पास देण्यात येणार आहे आणि त्यांनी त्यांना असलेल्या नजीकच्या वाळूघाटापासून पसंती क्रमांक दिल्यास त्या वाळू घाटावरून त्यांची ओळख पटवून त्यांना पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.अंबड तालुक्यात जवळपास पंधरा हजार पाचशे लाभार्थी असून त्यांच्या याद्या गावनिहाय तलाठी, मंडळ अधिकारी ग्रामसेवक यांना देण्यात आलेले आहेत.त्याचबरोबर त्यांच्याकडून अर्ज भरून घेण्याकरता गटविकास अधिकारी यांच्यामार्फत ग्रामसेवक यांना सांगण्यात आलेले आहे. तलाठी, मंडळ अधिकारी यांची बैठक घेऊन पात्र लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरता चे सर्व माहिती इत्यंभूतपणे देण्यात आलेली आहे. सदर योजना ही १० जून २०२५ पर्यंत असल्याने सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपले वाहन व भरण्याकरता साहित्य घेऊन मंजुरी झाल्यानंतर रेती उपलब्ध करून घ्यायची आहे. सदर योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा याविषयी आवाहन करण्यात येते. त्याचबरोबर शासकीय यंत्रणांना शासकीय कामांना रेतीची मागणी झाल्या नुसार बारा हजार आठशे ब्रास रेती त्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.अंबड तालुक्यातील १० रेती घाटावरून सदरची रेती उपलब्ध करून देण्यात येणार असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे. उपरोक्त संदर्भ अन्वये माननीय नारायण कुचे विधानसभा सदस्य बदनापूर यांनी उपस्थिती लावून उपरोक्त शासन निर्णयानुसार पात्र घरकुलधारकांना मोफत पाच प्रास रेती देण्यात येणार असून सदर योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले.त्याचबरोबर उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी तथा सरपंच यांना सुद्धा सविस्तर मार्गदर्शन केले

सदर वेळी तहसीलदार विजय चव्हाण, गटविकास अधिकारी उदय राजपूत, मुख्याधिकारी उकिरडे मनोज, नायब तहसीलदार विश्वास धर्माधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता दगुला व इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते

# शिवसेनेच्या बीड तालुकाप्रमुखपदी संतोष जाधव

**बीड । प्रतिनिधी**

**शिवसेना शिंदे गटाच्या बीड तालुका प्रमुखपदी संतोष जाधव यांची निवड करण्यात आली आहे. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते जाधव यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांची उपस्थिती होती.**




मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन रॅलीसाठी मंत्री संजय सिरसाट शनिवारी बीडमध्ये होते. हा कार्यक्रम झाल्यानंतर संतोष जाधव यांच्या शिवसेनेच्या बीड तालुकाप्रमुखपदी संतोष जाधव यांची निवड जाहीर झाली. त्यानंतर त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. शिवसेना पक्षासाठी संतोष जाधव यांनी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांची तालुकाप्रमुखपदी निवड झाली आहे. सामाजिक कार्यात जाधव हे नेहमीच अग्रेसर असतात. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होताच त्या निकाली काढण्याचे काम त्यांनी गत दोन वर्षांत केले आहे. तसेच नागरिकांना काही अडचण आल्यास मदतीला धावून जाणारा नेता म्हणून संतोष जाधव यांची ख्याती आहे.

# जिर्ण झालेले विद्युत पोल तात्काळ बदला–नुमान चाऊस

माजलगाव। प्रतिनिधी

शहरातील विविध भागातील विद्युत वाहक पोल हे जिर्ण झाले आहेत. त्यामुळे ते कोसळून जिवीत हानी होऊ शकते. त्या करीता विज महावितरण कंपनीने हे जिर्ण झालेले विद्युत पोल बदलून पर्यायी पोल उभरावे अशी मागणी मौलाना आझाद युवा मंचचे बीड जिल्हा अध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे.



माजलगाव शहरातील मुख्य रस्त्यासह गल्ली बोळातील विद्युत पोल हे अनेक पर्षापासून बदलण्यात न आल्याने ते जिर्ण झालेले आहेत. त्यामुळे ते केंव्हाही कोसळून जिवीत हानी होऊ शकते. त्यामुळे प्रामुख्याने माजलगाव शहरातील मोगल मोहल्ला व अरब गल्ली भागात विज वाहक पोल हे जमिन लेवलला जिर्ण झाले असून ते धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. परंतू महावितरण कंपनीला या विद्युत वाहक पोल बदलने व जिर्ण झालेल्या तारा बदलण्यात कसल्याच प्रकारे कर्तव्य जाणून येत नाही. तरी तात्काळ महावितरण कंपनीने हे जिर्ण झालेले विद्युत पोल बदलावेत अन्यथा काही अनुचित प्रकार घडल्यास या सर्व प्रकारास महावितरण कंपनीचा अनागोंदी कारभार कारणीभूत ठरणार आहे. तात्काळ हे पोल बदलावे व भविष्यात होणारी जिवीत हानी व अनुचित प्रकार महावितरण कंपनीने टाळावा अशी मागणी मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हा अध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे.

पान १/४ वरून

## अखिल भारतीय भ्रष्टाचार

इंगोले, बीड जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव हिंदोळे यांची निवड करण्यात आली,तसेच मराठा महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके मराठा महासंघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष व पौडूळ विद्यमान सरपंच बापूसाहेब मराडे, भष्टाचार निर्मुलन समिती बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रमेश्वर बप्पा कवचट, राठोड, बालाजी इंगोले , गणेश सुर्वे, बाळासाहेब देवगुडे, पत्रकार,सौ.सीमाताई शिलावंत, सौ.जाधव मॅडम,बंडू आप्पा कोलंगडे,बंडू घोडके, गणेश ढगे,विलास इंगोले, बाळासाहेब भोरे,तसेच मित्र परिवार व पदाधिकारी उपस्थित होते...

यावेळी जिल्हाध्यक्ष पदाची धुरा घेतल्यानंतर शिवाजीराव हिंदोळे व सौ. सारिका पाटील यांनी बीड जिल्ह्यात या संघटनेच्या सभासद नोंदणी करून जास्तीत जास्त महिलांचा व पुरुष यात सहभाग करून या सामाजिक कार्याचे धुरा सांभाळून या संघटनेत महिलांचा जास्त सहभाग घ्यावयास पुढाकार घेणार असून भ्रष्टाचार निर्मूलन विषयी ज्येष्ठ कार्यकर्त्याच्या माध्यमातून त्यांच्या मार्गदर्शनाखाली या संघटनेचे चांगल्या पद्धतीने वाटचाल करण्याचा या वेळी आश्वासित केले.

## अनिल जाधवर

सर्जेराव तांदळे, शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, लेखा वित्त अधिकारी सुरेश केंद्रे, काँग्रेसचे दादा मुंडे, प्राचार्य डॉ. विक्रम सारूक, प्राचार्य खुशालराव मुंडे, प्रा.भाऊसाहेब सानप, उपलेखा वित्त अधिकारी संजय नागरगोजे, उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे, उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, शा.पो अधीक्षक रंगनाथ राऊत, गटशिक्षणाधिकारी समंदर खान सह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी शिक्षण प्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले.

## रात्रीच्या वेळी घरात घुसून

लंपास केली आहे.दरम्यान,या घटनेमुळे नेकनूर व परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.नेकनूर पोलिस स्टेशन पासून घटनास्थळांचे अंतर केवळ एक किलोमीटरचे आहे.असे असतानाही पोलिसांकडून रात्रीची गस्त होत नसल्याचे यावरून दिसून येत आहे.ग्रामस्थांनी अनेकवेळा गावात रात्रीची गस्त करण्याची मागणी केली आहे.परंतु, या मागणीकडे पोलीसांनी यांनी दुर्लक्ष केल्यामुळे नेकनूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गावांमध्ये चोरी आणि लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

## राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरणाच्या

हि मोहिम दि. १३ मे ते १५ ऑगस्ट २०२५ या दरम्यान राबविण्यात येणार असुन मोहिमे दरम्यान केवळ मुलांची ओळख निर्माण न करता त्यांना शिक्षण, आरोग्य, निवारा, सामाजिक समावेश आणि कायदेशिर संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. ही मोहिम बालहित सर्वतोपरी या तत्वावर आधारित असुन बालकांचे सर्वांगिण पुनर्वसन आणि विकास हे मुख्य उद्देश आहे. या प्रक्रियेमध्ये विधी सेवा यंत्रणा, स्थानिक प्रशासन, पोलिस विभाग, सामाजिक संस्था आणि बालकल्याण समित्या एकत्रितपणे काम करणार आहे.मोहिमेच्या शुभारंभाप्रसंगी न्या. आर.जी.बागडे यांनी होलिस्टीक इनक्लुयुजन या संकल्पनेवर प्रकाश टाकतांना सांगितले की, ही मोहिम केवळ आधारकार्ड नोंदणी पुरती मर्यादित नसुन त्यामध्ये मुलांचे सामाजिक, शैक्षणिक आरोग्य व कायदेशीर हक्काचे संरक्षण आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी एकात्मिक दृष्टीकोन ठेउन काम करणार असल्याचे सांगितले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव आर. जि. बागडे यांनी साथी मोहिमेचा उद्देश, अंमलबजावणी प्रक्रिया व अपेक्षित परिणाम याबबत मार्गदर्शन केले.

साथी मोहिम जिल्हयात यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व संबंधित विभाग, शासकीय अधिकारी, सामाजिक संस्था आणि विधी स्वयंसेवक/अधिकारमित्र सज्ज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर. एस. गावरस्कर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्वयंसेवक जी.जी. पीटील यांनी केले.

## लोकलढा आंदोलनांची

दुसऱ्या दिवशी शिवसेना गेवराई तालुका प्रमुख उध्दव मडके यांच्या नियोजनामुळे बाळासाहेब किसवे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी महामंडळाचे उपाध्यक्ष राज्यमंत्री दर्जा यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्याची संवाद साधला, यावेळी शिवसेना तुमच्या पाठीशी आहे, असं आश्वासन दिले.यावेळीसुयश कर्चे शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख, दत्ता भाऊ म्हेत्रे, शिवसेना

पान १/४ वरून

संभाजीनगर, जिल्हाप्रमुख, हेमंत भोईटे, शिवसेना सातारा, जिल्हाप्रमुख, योगेश धूम, शिवसेना पुणे, जिल्हाप्रमुख, पंढरी जायनुरे, मराठवाडा युवा संपर्क प्रमुख, परमेश्वर घोडके प्रवक्ता ओबीसी, व्ही जी एन टी महाराष्ट्र राज्य, पुष्पाताई मुंडे, मराठवाडा महिला शिवसेना प्रमुख, ड, नारायण शिंदे शिवसेना उपजिल्हाप्रमुख, बीड, उध्वव मडके, गेवराई तालुका शिवसेना प्रमुख,तांदाळ्याचे सरपंच नवनाथ गवते सह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हाथी चले बाजार..

त्यामुळे त्यांच्याकडे चांगला आणि कायमचा युवासैनिक जोडलेला आहे हीच गोष्ट काहीना पटत व सोसत नाही त्यामुळे त्यांनी टीकास्त्र चालू केल आहे,बाजीराव दादांच्या माध्यमातून आतापर्यंत १५ कोटी रुपयांची मदत मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून झाली आहे हे त्या चमचोगीगिरी कार्यकर्त्याला खपत नाही,त्याना एवढच सांगण आहे का तुम्ही स्वतः कामाच्या माध्यमातून कर्तृत्व सिद्ध करून दाखवा आणि मगच आरोग्यदूत बाजीराव दादा वर टीका करा..

## केशवराव घिगे यांची

जगताप, जिल्हा प्रमुख सचिन मुळक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर युवा सेनेचे बाजीराव चव्हाण, युवा सेनेचे जिल्हा प्रमुख रविराज बडे, उपजिल्हाप्रमुख ॲड.नारायण शिंदे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

केशव घिगे हे गेल्या अनेक वर्षापासून बीड जिल्ह्याच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात ते सक्रिय असून जिल्ह्यासह मुंबई पर्यंत अनेक वरिष्ठ नेत्यांशी त्यांचे सलोख्याचे संबध असून जिल्ह्यातील ग्रामीण भागातही त्यांचा दांडगा जनसंपर्क आसल्याने अनिल दादा जगताप यांनी त्यांची शिफारस करत त्यांना शिवसेनेत सक्रिय करून ही जबाबदारी दिली या निवडीमुळे शिवसेना पक्ष वाढीसाठी नक्कीच फायदा होईल. त्यांच्या या कार्याची दखल घेऊनच दखल घेऊनच वरिष्ठांनी त्यांना जिल्हाभरात पक्ष वाढीचे काम करण्याची संधी देत थेट सहसंघटक पदाची जबाबदारी दिली असून त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## पत्रकारांना धमकी देणाऱ्या

यांच्या नावाचा साधा उल्लेखही नाही तरी सुद्धा पत्रकारांना संपविण्याची असंविधानिक भाषा वापरणाऱ्या आमदार कदमावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अशोक होळकर मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष अनिल देवा कुलकर्णी ,जिल्हा कार्याध्यक्ष दत्तात्रय नरनाळे ,जिल्हा सचिव विठ्ठल घरत,प्रदीप आनेराव ,अस्लम पठाण ,सिध्दांत खवतड, अंकुश पवार,यांनी केली आहे.

## गेवराई येथील नगरपरिषदच्या

तेव्हा आर्या ही खूप अशक्त झालेली होती व तिच्या पायातून मोठ्या प्रमाणावर रक्त निघत होते हा प्रकार पाहताच अमोल वावरे यांनी आर्याला दवाखान्यात घेऊन गेले असता चक्क तिच्या पायाला सात टाके पडले. या अगोदरही अशा काही घटना घडल्या होत्या व ठेकेदारांकडे पालकांनी जाब विचारला परंतु ठेकेदारांनी उडवा उडवीची उत्तर देत प्रकरण रफादफा केल्याचेही बोलले जात आहे. या घडलेल्या प्रकारावरून पालक अमोल वावरे आपले व त्यांनी जाब विचारला असता त्यांच्याशी उडवाउडीचे उत्तरे देण्यात आली परंतु घडलेला प्रकार हा अतिशय गंभीर असून या ठेकेदारावर कारवाई होणार का? सिओ यांनी या प्रकरणाची दखल घेत सदरील ठेकेदाराला समज देवून त्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

## युवा सेना मराठवाडा निरीक्षक

वृक्ष हे एकादा उपक्रम राबवायचा आहे म्हणून लावले नाहीत. लावलेले प्रत्येक झाड जगवण्यासाठी आम्ही मेहनत घेणार आहोत. त्यामुळेच आम्ही चिंच, नारळ, आंबा, जाम,लिंब,वड, पिंपळ यासारखे सावली आणि फळ देणारे झाडे निवडली आहेत.

– अविनाश जाधव, युवा सेना मराठवाडा निरीक्षक

## पात्र शेतकऱ्यांना शंभर टक्के

चे इष्टांक रु १७०७ कोटी पैकी ११७३ कोटी पूर्तता ६९% आहे. पैकी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची पूर्तता ६१% आहे. या बँकेची आर्थिक स्थिती विचारात घेता राष्ट्रीयकृत बँकेकडून अपेक्षित पूर्तता झालेली नाही, ही बाब विचारात घेता चालू खरीप हंगामामध्ये एकूण इष्टांक रुपये १५६६ कोटी पैकी राष्ट्रीयकृत व इतर बँकांकडून इष्टांक पूर्तता अनिवार्य करण्यात यावी. कृषी, महसूल व सहकार

पान १/४ वरून

विभागाचे समन्वयातून पात्र खातेधारकांना १०९% सभासद करून घेणे व नवीन सभासदांना कर्ज वाटप करण्याची विशेष मोहीम हाती घेणे आवश्यक आहे.

चालू हंगामात शेतकऱ्यांना खते बी बियाणे यांचा मुबलक पुरवठा वेळेत होईल तसेच त्यांचे लिंकिंग होणार नाही याकरिता यंत्रणेने दक्ष राहणे तसेच बोगस बियाणे व चढ्या दराने विक्रीस प्रतिबंध करण्यात यावा व त्याविरुद्ध दाद मागण्याची यंत्रणा शेतकऱ्यांकरिता प्रसिद्ध करण्यात यावी. असे दिलेल्या निवेदन डॉ. ज्योती मेटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली जेणेकरून शेतकऱ्यांची खरीप हंगाम २०२५ मध्ये फसवणूक होणार नाही. या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुकाध्यक्ष पंडित माने, मनोज जाधव, जितांजली डोरले,संगीता ठोसर, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले आदी उपस्थित होते.

सर्व कृषी सेवा केंद्र बाहेर शेतकऱ्यांसाठी हेल्पलाइन नंबर लावणारा – विवेक जॉन्सन

या मागण्यांना मा.जिल्हाधिकारी महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत उपरोक्त विषयांवर जिल्हा प्रशासन तत्परपणे काम करेल असे आश्वासन दिले. त्याचबरोबर बोगस बियाणे आणि बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांना समस्या निर्माण होऊ नये याकरिता प्रशासनाच्या वतीने टोल फ्री क्रमांक आणि थेट जिल्हाधिकाऱ्यांना समस्या पोहोचतील याकरिता एक मोबाईल नंबर सर्व कृषी सेवा केंद्रांच्या बाहेर जाहीर रित्या लावण्यात येईल,डी.एल.सी.सी सभेमध्ये कर्ज वाटपाचा नियमित घेण्यात येईल असे त्यांनी यावेळी नमूद केले.

## डॉ.योगेश क्षीरसागरांच्या

(दि.२६) शहरात स्वच्छता मोहीम गतिमान केली आहे.

शहरातील गटारी, रस्त्यांची सफाई, कचऱ्याची विल्हेवाट, पाण्याचे साचलेले ठिकाणे, डासनिर्मूलन अशा विविध बाबींवर विशेष भर देण्यात येत आहे. स्वच्छता मोहिमेच्या पहिल्याच दिवशी डॉ.योगेश क्षीरसागर स्वतः मोहिमेच्या ठिकाणी उपस्थित राहिले. त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधत स्वच्छता कामकाजाची माहिती घेतली व यंत्रणेकडून नियोजनबद्ध पद्धतीने काम करून घेतले. यावेळी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे, स्वच्छता विभागाचे अधिकारी व कर्मचारी, विविध भागातील माजी नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आर.टी.देशमुख

फ्लायओव्हरवरील पाच लोखंडी कठडे तोडत सर्व्हिस रोडच्या बाजूला येऊन पडली. त्यांची कार अत्यंत वेगात असल्याने कारने चार पलट्या खाल्ल्या होत्या. गाडी अक्षरशः चक्काचूर झाली होती. बाजूलाच बेलकुंड पोलिसांचा आऊट पोस्ट आहे. त्यांनी तात्काळ रुग्णवाहिकेला संपर्क केला. गाडीतील जखमींना तातडीने बाहेर काढण्यात आले. मात्र, उपचारासाठी लातूरकडे घेऊन निघाला असतानाच वाटेतच माजी आमदार आर टी देशमुख यांचा मृत्यू झाला.

या रस्त्यावर बेलकुंड परिसरात उड्डाण पुलावरील उतरणीला पाणी जमा होते. हे पाणी वेगात असलेल्या वाहनाच्या काचेवर येते. वाहन चालकाचा अंदाज चुकतो. त्यामुळे ब्रेक लावण्याच्या घाईत अनेक वाहने पलटी होतात. यापूर्वी याठिकाणी अशाप्रकारे तीन वाहनं पलटी झाली आहेत. मात्र किरकोळ जखमा आणि गाडीचं नुकसान यापलीकडे काही झालं नाही. मात्र, आर. टी. देशमुख यांच्या वाहनाचा अपघात झाला त्यांचा मृत्यूही झाला.

## जिजा भाऊंच्या अकाली

शोक व्यक्त केला असून, आर. टी. जिजा देशमुख हे स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब तसेच स्व. पंडित अण्णा मुंडे यांचे जिवलग सहकारी म्हणून सर्वपरिचित होते. माझ्या राजकीय व सामाजिक जडणघडणीत देखील जिजा भाऊंचे एक अढळ स्थान आहे. मुंडे आणि देशमुख कुटुंबाचे पिढीजात नाते असून, आज त्या नात्यातील आणखी एक छाया आम्हाला पोरके करून गेली, अशी भावनिक प्रतिक्रिया धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

माजी आमदार आर. टी. देशमुख यांचे आज लातूर जिल्ह्यात प्रवासादरम्यान अपघाती निधन झाले असून, त्यांच्या अकाली निधनाने संपूर्ण बीड जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. आपण संपूर्ण देशमुख कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत, अशी प्रतिक्रिया व्यक्त करत धनंजय मुंडे यांनी आर. टी. जिजा देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाबरोबर शास्त्रीय शेतीचे धडे

## सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला विद्यार्थी पिकवतात

बीड । प्रतिनिधी

आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाबरोबर आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती कशी करावी. यात जमिनीची योग्य निवड, सिंचन, खत आणि कीटकनाशकांचा योग्य वापर कसा करावा. तसेच पीक व्यवस्थापनाचे तंत्रज्ञान कसे असावे याचे प्रात्यक्षिक थेट शेतीत केले जाते. दरवर्षी येथे विद्यार्थी सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला विद्यार्थी पिकवतात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी कृषी शिक्षणाबरोबर शास्त्रीय शेती प्रात्यक्षिकांचे धडे प्रगतशील भारताच्या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी महत्वाचे असल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या



संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या संकल्पनेतून दरवर्षी सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला शेती विद्यार्थी, प्राध्यापक पिकवतात. त्यातून विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील सखोल माहिती मिळते.

कृषी पदवीधर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा भाग म्हणून प्रत्यक्ष शेती व त्यातही शास्त्रीय दृष्ट्या व्यवस्थापन करण्याचा अनुभव मिळतो. त्यामुळे आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर घरच्या शेतीत किंवा नोकरी व्यवसायात त्याचा चांगला उपयोग होतो. आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, प्रा. श्याम भूतडा, प्रा. अमोल सानप, प्रा.जुबेर बागवान. प्रा ज्ञानेश्वर गव्हाणे. प्रा. सुधीर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी हा अनुभव दरवर्षी घेतात. आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी घडला पाहिजे. तो केवळ पुस्तकी ज्ञानापुरता मर्यादीत न राहता. तो त्या-त्या क्षेत्रात प्रत्यक्ष उतरला पाहिजे यासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमीच विविध उपक्रम राबवले जात आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी चालू हंगामात २० गुंठ्यांत कलिंगडाचे १५ टन इतके विक्रमी उत्पादन घेऊन किमया केली. या कलिंगड उत्पादनातून त्यांनी दीड लाख रुपयांचे उत्पादन देखील मिळवले. आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने शेतकऱ्यांनी कोणत्या हंगामात कोणते पिक घ्यावे त्या संदर्भात शेतीची मशागत कशी आणि केव्हा करावी. पिक घेतांना कोणते औषध केव्हा आणि किती फवारावे. या संदर्भात शेतकऱ्यांना कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात करण्यात येणार आहे.

# आष्टी मतदारसंघात पंचनामे करण्याच्या सूचना

आष्टी । प्रतिनिधी

**अवकाळी पावसाने रब्बीचे नुकसान झालेल्या भागातही मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यानुषंगाने मराठवाड्यासह आष्टी मतदारसंघात पंचनामे करण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले.**

महाराष्ट्र राज्यात पावसाने मे महिन्यातच धुमाकूळ घातला आहे.गेल्या आठ दिवसांत पावसाने आष्टी,पाटोदा,शिरुर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेतक-यांचे नुकसान झाले आहे.दि. १२ मे पासुन सुरू असलेल्या अवकाळी पाऊस (अतिवृष्टी) झाल्यामुळे.. शेतकऱ्यांच्या कांदा, उन्हाळी बाजरी, चाऱ्याची मका इत्यादी हाता तोंडाशी आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

त्या अनुषंगाने रविवार (दि.२५) रोजी सायंकाळी ६ वा.आमदार सुरेश धस यांनी पावसाचा आढावा घेतला.यावेळी ते बोलत होते.पुढे बोलतांना आ.धस म्हणाले,गेल्या आठ दिवसांपासून आष्टी मतदारसंघातील तिन्ही तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला आहे.

यामध्ये कांदा,आंबा,डाळींब यासह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आष्टी, पाटोदा, आणि शिरूर का. या तीनही तहसीलदार, गट विकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्याशी दोन दिवसांपूर्वी बैठक घेत याबाबत चर्चा झाली होती, त्यानुसार आजपासून कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक यांनी झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे सुरु झाले आहे. त्यामुळे सर्व बाधित शेतकऱ्यांनी आपल्या पिकांच्या झालेल्या नुकसानीची माहिती, संबंधित तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक यांना देऊन पंचनामे करण्यासाठी सहकार्य करावे.सर्व नुकसानीचा अहवाल दोन दिवसांत देण्याच्या सुचना आमदार सुरेश धस यांनी दिल्या आहेत.

# आडत व्यापाऱ्यांना गंडवीणारा महाठग, बालाजी कोयले माजलगाव पोलिसाच्या जाळ्यात; योगेश हांडे फरार

माजलगाव । प्रतिनिधी

**माजलगावसह नागपूर, बिलोली, धाराशिव, लातूर, कर्नाटक येथील यादगीर व महाराष्ट्र राज्यातील अनेक आडत व्यापारी यांना बनावट व्यापारी -ब्रोकर्स बनून करोडो रुपयांना चुना लावलेला महाठक बालाजी कोयले अथक प्रयत्ननंतर माजलगाव पोलिसाच्या जाळ्यात अडकला आहे. त्याला माजलगाव न्यायालया ने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.त्याचा सहकारी योगेश हांडे आजही फरार आहे.**

माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं.७६/२०२४ या गुन्हयामध्ये आरोपी नामे बालाजी एकनाथ कोयले व योगेश लालासाहेब हांडे यां दोघांनी फिर्यादी विष्णुदास भिकुलाल भुतडा, वय४०: माजलगाव यांना ३२ लाख रु ला गण्डवले होते.भूतडा यांच्या माजलगाव येथील शिवम ट्रेडींग कंपनी या आडत दुकानमध्ये दिनांक २७/०२/२०२४ रोजी तुर चना विक्रीसाठी





आहे का असे म्हणून लातुर येथील गोपाल कॅन्ड्रॉसिंग च्या बनवट नावाखाली बालाजी एकनाथ कोयले व योगेश लालासाहेब हांडे त्यांनी चना माल एकूण १२१ क्वींटल ५० किलो त्याची एकूण किंमत ७,४२,०००/- व तुर माल २५ टन ज्याची किंमत २५,३७,५६५/- असे घेवून सदर माल हा माहेश्वरी पल्सेस दाल मिल लातुर या ठिकाणी दयावयाचा असल्याचे सांगून त्या नावाने सदरील दोन्ही मिळुन बिलाची एकूण रक्कम रु.३२,७९,७६५/- रुपये या नावाने बिल करून सदर बिलाची रक्कम आर.टी.जी.एस. व्दारे देतो असे म्हणुन सदरील माल ट्रक क्रमांक एम एच ४० सी.एम.४५९० या ट्रकने नेवून त्यांनी परस्पर विक्री करून फसवणुक केली होती. फिर्यादीनुसार बालाजी एकनाथ कोयले व योगेश लालासाहेब हांडे यांच्या विरुध्द कलम ४२०,४०६ व ३४ नुसार गुन्हा रं.नं.७६/२०२४ हा दाखल झालेला होता. या गुन्ह्यात तबल सव्वा वर्षानंतर यश आले असून यातील मुख्य आरोपी बालाजी कोयले पोलिसाच्या ताब्यात आहे. त्याने यादगीर कर्नाटक येथील व्यापाऱ्यास दोन कोटींचा, बिलोली येथील व्यापाऱ्यास १८ लाखास, माजलगाव येथील कोल्हे या व्यपाऱ्यास १२ लाख तर लातूरला एम आय डी सी पोलीस ठाण्यात दरोडा व फसवूक या गुन्ह्यात हा आरोपी आहे. माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, उपनिरीक्षक सतीश दिंडे यांनी यास अटक केली असून पाच दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे.

# दिवाळीपर्यंत ७५ हजार घरांच्या स्वप्नपूर्तीसाठीचे नियोजन; ३३,६४८ लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे वाटप



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सन २०१६-१७ ते २१-२२ या वर्षात एकूण ३४,२३९ घरकुलापैकी ३१३२ घरकुले पूर्ण करण्यात आली आहे एकूण ९१.५४ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. तर दुसऱ्या टप्प्यात सन २०२४- २५ मध्ये एकूण ८०, ३३३ दिवाळीपर्यंत ७५, ५०५ घरकुले पूर्ण करण्यात येणार असल्याची घोषणा नुकतीच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार यांनी केली. त्या दृष्टीने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या मार्गदर्शनाखाली उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठीचे नियोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत मराठवाड्यात बीड जिल्हा अव्वलस्थानी आहे.



जिल्ह्यात तालुकानिहाय उद्दिष्ट पुढील प्रमाणे देण्यात आले आहे. अंबाजोगाई ७,२२५, आष्टी ९,५९७, बीड १२,५४१, धारूर ४,९७९, गेवराई १२,३२७, केज ९, २०४, माजलगाव ७,३०२, परळी ६,२१३, पाटोदा ४२५६, शिरूर (कासार) ३,९३३, वडवणी २,७५६ एकूण ८०,३३३, उद्दिष्ट आहे. आतापर्यंत ३३,६४८ लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याची वाटप करण्यात आले आहे. जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका संगीतादेवी पाटील आणि त्यांचे सहकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उद्दिष्ट पूर्तीसाठीचे नियोजन केले आहे.

**सीईओ साहेब, बीडीओंना कामाला लावा**

तालुकास्तरावर घरकुलाचे उद्दिष्ट प्रदेशासाठी गटविकास अधिकारी यांनी, सरपंच, ग्रामविकास अधिकारी यांच्या मार्फत प्रामाणिक प्रयत्न केल्यासच विहित कालावधीत उद्दिष्टपूर्ती होईल, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बीडीओंना कामाला लावणे गरजेचे आहे, अशी ही प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली आहे.

# बीड शहरात रिपाइंच्या वतीने दि. ३० मे ला भारत झिंदाबाद यात्रेचे आयोजन:पप्पू कागदे

बीड । प्रतिनिधी

जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठ्ठावीस जणांची क्रूर हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिंदूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशत वाद्यांची ठिकाणी उद्ध्वस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी भारतीय सैनिकांनी केलेल्या सिंदूर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षाच्यावतीने या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलिदान दिलेल्या शहीद जवानांना




अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड शहरात दि. ३० मे २०२५ शुक्रवार रोजी रिपाइंच्या वतीने सकाळी ठीक ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तिरंगा ध्वज हाती घेऊन भारत जिंदाबाद यात्रेस सुरुवात करण्यात येणार आहे. भारत जिंदाबाद यात्रा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार असल्याची माहिती भारत जिंदाबाद यात्रेचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. बीड शहरात जिल्हा रिपाइंच्या वतीने काढण्यात येणारी भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, महिला आघाडी पदाधिकारी, युवा रिपाइं पदाधिकारी यांच्यासह रिपाइं कार्यकर्त्यांनी भारत जिंदाबाद यात्रेत हजारोच्या संख्येने सामील होऊन भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करावी असे आवाहन यात्रेचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

# संपादक गावरस्कर आण्णांचा, बुधवारी गौरव सोहळा

बीड । प्रतिनिधी

येथील ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम आण्णा गावरस्कर यांना अखिल भारतीय मराठी पत्रकार





परिषदेचा नागोराव दुधगावकर पत्रकारिता पुरस्कार जाहीर झालेला आहे. त्याबद्दल बीड येथील पत्रकार मित्र मंडळींच्या वतीने गौरव सोहळा बुधवार २८ मे रोजी १२.३० वाजता पत्रकार भावन येथे आयोजित केला आहे.

यापूर्वीचा हा पुरस्कार बीड येथील ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख आप्पा यांना देण्यात आला होता, यावेळी जेष्ठ पत्रकार मधुकर भावे आणि मान्यवरांच्या उपस्थितीत अलिबाग येथील सोहळ्यात बीडचा मोठा सहभाग राहिला होता. यावर्षी मधुकर भावे यांच्या जीवनगौरव पुरस्कार सन्मानासोबतच बीड येथील संपादक गावरस्कर आण्णा यांना नागोराव दुधगावकर पुरस्कार घोषित झाला असून मुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या उपस्थितीत लवकरच मुख्य गौरव सोहळा मुंबईत संपन्न होणार आहे. यानिमित्ताने बीड येथील पत्रकार मित्र मंडळी च्या वतीने आण्णांचा सन्मान ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी सोलापूर आणि अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या उपस्थितीत बुधवारी होत आहे. बीडच्या पत्रकारितेच्या या सन्मान सोहळ्यास, संपादक , पत्रकार, माध्यम क्षेत्रातील मित्रांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# बोरीपिंपळगावच्या माजी उप सरपंचास गेवराईत मारहाण

## स्विफ्ट गाडी फोडली फिल्मी स्टाईलने अपहरण करण्याचा प्रयत्न

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील बोरीपिंपळगाव येथिल माजी उप सरपंच आपल्या खाजगी कामानिमित्त गेवराईला आले असता त्यांना काही आज्ञाताकडून जबर मारहान झाली असल्याची घटना घडली असून असुन मारेकरी यांनी त्यांची स्विफ्ट डिजायर गाडी देखील फोडली व त्यांचा अपहरण करण्याचा प्रयत्न केला आहे सदरची घटनेमुळे गेवराई शहरात खळबळ माजली आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,तालुक्यातील बोरीपिंपळगाव गाव याठिकाणचे माजी उप सरपंच गणेश वडगणे हे गेवराई शहरात आपल्या खाजगी कामानिमित्त आले होते तसेच त्यांच्यावर सरकारी दवाखाण्यासमोर हल्ला चढवून जबर मारहान केली आहे तसेच ही हानामारी फिल्मी स्टाईलने करण्यात आली तसेच यामध्ये हातावर पायावर जबर ईजा झाली आहे ऐवढ्यावरच न थांबता त्याचे अपहरण देखील करण्याचा प्रयत्न मारेकरी यांनी केला होता तसेच ही घटना वाळूच्या तस्करीतून झाली असल्याचे बोलले जात असून त्यांना तात्काळ गेवराईच्या उपजिल्हा रूग्णलयात दाखल केले असता त्यांना जबर मारहान असल्या कारणाने पुढील उपचारासाठी बीड याठिकाणी हलवण्यात आले आहे तसेच या घटनेमुळे गेवराई शहरात मोठी खळबळ उडाली असून कायदा व सुवैस्था यांच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# जिल्ह्याचे भूमिपुत्र, कृषिमित्र गजेंद्र बडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची डॉक्टरेट पीएचडी जाहीर

पुणे । प्रतिनिधी

**दि. २७ मे २२५ :- बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र, कृषिमित्र गजेंद्र प्रभाकर बडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यावाचस्पती (पीएच. डी.) ही पदवी जाहीर केली आहे. बडे यांनी 'मराठीतील कृषिविषयक नियतकालिकांचा अभ्यास' या विषयावर संशोधन करुन पुणे विद्यापीठाला शोध प्रबंध सादर केला होता. विद्यापीठाने हा शोध प्रबंध स्विकारला आहे. मराठीतील कृषिविषयक नियतकालिकांचा अभ्यास' या विषयावर राज्यात याआधी एकही संशोधन झालेले नाही. त्यामुळे या विषयावरील बडे यांचे हे संशोधन राज्यातील एकमेव संशोधन ठरले आहे.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथील मराठी संशोधन केंद्रात हे संशोधन करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथील साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गजेंद्र बडे यांनी हे संशोधन पूर्ण केले. पीएच. डी. ही विद्यापीठाची सर्वोच्च पदवी जाहीर झाल्याबद्दल अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस आणि अहमदनगर महाविद्यालयातील मराठी संशोधन केंद्राचे विभागप्रमुख डॉ. सुधाकर शेलार यांनी गजेंद्र बडे यांचे अभिनंदन केले आहे.



गजेंद्र बडे हे मूळचे बीड जिल्ह्यातील दुकडेगाव (ता.वडवणी) या छोट्याशा खेड्यातील एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले असून, मागील २५ वर्षांपासून पुण्यात पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात कार्यरत आहेत.

दरम्यान, गजेंद्र बडे हे मागील २५ वर्षांपासून पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात कार्यरत आहेत. बडे यांनी आतापर्यंत विदर्भातील दैनिक देशोन्नतीचे मंत्रालय विशेष प्रतिनिधी, दैनिक पुढारीच्या पुणे आवृत्तीत बातमीदार, उपसंपादक आणि दैनिक सकाळमध्ये बातमीदार व प्रिन्सिपल करस्पाँडंट या पदांवर काम केलेले आहे. बडे यांची आतापर्यंत चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. यापैकी एका पुस्तकाला राज्य सरकारचा उत्कृष्ट वाङ्मय तर, एका पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार मिळालेला आहे. याशिवाय पुण्याच्या पत्रकारितेत मानाचा समजल्या जाणाऱ्या पत्रकार वरुणराज भिडे आश्वासक पत्रकारिता पुरस्कारासह केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांचे मिळून १३ पुरस्कार मिळालेले आहेत. याआधी गजेंद्र बडे यांना कृषी क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल के. शंकरनारायणन यांनी कृषिमित्र या पदवीने गौरविलेले आहे. याशिवाय बडे हे देशातील पहिल्या पत्रकार मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले आहेत.

# कीर्तीनगर येथील तुंबलेल्या नाल्यामुळे अस्वच्छतेचा कहर ; स्वच्छता, वीजेच्या प्रश्नांसह नागरिकांना मूलभूत सुविधा द्या- श्रीनिवास राऊत

परळी वै.। प्रतिनिधी

**प्रभाग क्र ५ मधील कीर्ती नगर येथील नागरी सुविधा मिळत नसल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नाली तुंबलेली, पावसाळा पूर्व कामे अपूर्ण कामे अर्धवट खडे, खोदून ठेवल्यामूळे अपघात प्रमाण वाढले आहे. दिवस व रात्री नागरिक लहान मुलं वृद्ध व्यक्ती आणि जनावरे खड्यात पडली. मिलिंद कॉलेजच्या मागील रोड वर वीजचे पोल नसल्यामुळे रात्री अपरात्री चोरीचे आणि लूटमारूचे प्रमाण वाढले. त्यामुळे या भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा द्या अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास राऊत यांनी दिला आहे.**

परळी शहराच्या स्वच्छतेसाठी नगर परिषदेने वर्षाकाठी कोटीची उड्डाणे घेतली असली तरी शहरातील स्वच्छतेची स्थिती केविलवाणी आहे. नगरपालिका स्वछता विभागाच्या ढिसाळ नियोजना मुळे सर्वत्र तुंबलेल्या नाल्या मुळे शहरात सर्वत्र अस्वछता व दुर्गंधी ने उच्छाद मांडला. अस्वछतेचा उच्छाद मांडला असून शहरातील सर्वच भागात तुंबलेल्या नाल्या व दुर्गंधी मुळे नागरिक त्रस्त झाले असून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आता पावसाळा जवळ आलेला असतांना मान्सूनपूर्व स्वच्छतेची कोणतीच कामे शहरात केलेली नसतांना किमान दैनंदिन नाल्या व रस्ते साफसफाई तरी निगरगट्ट नगरपालिका प्रशासनाने वेळेवर करून नागरिकांना अस्वछता व दुर्गंधी पासून दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे. पावसाळ्यापूर्वी शहरातील छोट्या मोठ्या नाल्यांची मान्सूनपूर्व नालेसफाई केली जाते. यावर्षी पाऊसकाळ चांगला असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. पाऊस झाल्यास नाले सफाई न केल्यामुळे घर दुकानात पाणी घुसून नागरिकांचे व व्यावसायिकांचे वित्तीय नुकसान होऊ शकते. त्यामुळे साफसफाई करावी तसेच प्रभाग क्र ५ मधील कीर्ती नगर येथील नागरी सुविधा मिळत नसल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नाली तुंबलेली अर्धवट खडे, खोदून ठेवल्यामूळे अपघात प्रमाण वाढले आहे. दिवस व रात्री नागरिक लहान मुलं वृद्ध व्यक्ती आणि जनावरे खड्यात पडली. वीजचे पोल नसल्यामुळे रात्री अपरात्री चोरीचे आणि लूटमारूचे प्रमाण वाढले. त्यामुळे या भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा द्या अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास राऊत यांनी दिला आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे





सायं. दैनिक
बीड
प्रारंभ
मंगळवार दि. २७ मे २०२५








# श्रीसावित्री सोलार कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक

## अंबाजोगाई तालुक्यात फॉल्टी सौर पंप आणि कंट्रोलरचे वाटप, शेतकरी अडचणीत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई तालुक्यात श्रीसावित्री सोलर कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक झाली असून शेतकऱ्यांना फॉल्टी पंप आणि कंट्रोलर चे वाटप करण्यात आले आहे. शेतकरी वारंवार कंपनीकडे तक्रार करीत असून या तक्रारीकडे कंपनीकडून दुर्लक्ष होत आहे. श्री सावित्री सोलर कंपनीकडून बंद सौर पंपाचे वाटप केल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. फॉल्टी पंप आणि कंट्रोलर वाटप केल्याची तक्रार महावितरण कंपनीकडे अशोक वाघमारे यांनी केली आहे.**

शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी यासाठी महाराष्ट्र शासनाने मागील त्याला सौर कृषी पंप योजना सुरू केली. अंबाजोगाई तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सौर कृषी पंपासाठी अर्ज केले. अनेक शेतकऱ्यांना सौर कृषी पंप मिळाले आहेत. काही शेतकऱ्यांनी सौर पंपासाठी श्री सावित्री सोलार कंपनीची



निवड शेतकऱ्यांनी केली होती. त्यांना सौर पंपाचे वाटप देखील झाले. अंबाजोगाई तालुक्यात अकरा शेतकऱ्यांना तीन एचपी सौर कृषी पंपाचे श्री सावित्री सोलर कंपनीकडून वाटप करण्यात आले. या अकरा शेतकऱ्यांना बंद असलेले सौर कृषी पंप आणि कंट्रोलर वाटप करण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतात सौर पॅनल बसविण्यात आले . बंद असलेले पंप बोरवेलमध्ये सोडण्यात आले. कंपनीने शेतकऱ्यांच्या शेतात पंप सुरू करून देण्याची हमी असताना देखील कंपनीने पंप सुरू करून न देताच पळ काढला आहे. शेतकरी कंपनीकडे वारंवार तक्रार करीत असले तरी कंपनी शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे साफ दुर्लक्ष करीत आहे. कंपनीकडे फोन केला असता कंपनीचे कर्मचाऱ्याकडून उडवा उडवीचे उत्तर देत आहेत. शेतकऱ्यांच्या पिकासह गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्भवला आहे.

आमच्या शेतात सहा मे रोजी श्री सावित्री सोलर कंपनीकडून सौर पंप बसवण्यात आला. हा पंप बंद आहे. कंपनीचे कामगार पंप सुरू करून न देताच तिथून निघून गेले. पंप खराब आहे कंपनीचे कर्मचारी येथील आणि तुमचा पंप सुरू करून देतील हे सांगून कंपनीचे कामगार सौर पंप बसवून निघून गेले. पंधरा दिवस झाले.कंपनीकडे अनेक वेळा तक्रार करूनही आमच्याकडे कोणी अजून देखील आले नाही.

–अशोक वाघमारे शेतकरी धानोरा खुर्द ता. अंबाजोगाई

# रात्रीच्या वेळी घरात घुसून चोरट्यांनी लाखोंचा ऐवज पळवला

## पोलीसांनी रात्रीची गस्त वाढवण्याची नागरिकांची मागणी

नेकनूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर गावामध्ये चोरट्यांनी दोन घरांमध्ये चोरी करून लाखोंचा ऐवज लंपास केल्याची घटना मंगळवारी (दि.१९) पहाटे साडेतीन वाजता उघडकीस आली.घटनेची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठले. मात्र, पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवरच ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

बीड तालुक्यातील नेकनूर गावातील सितादेवी वस्ती येथे ज्ञानोबा शिंदे यांच्या घरामध्ये कुलूप तोडून चोरट्यांनी प्रवेश करून घरातील २३ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले.यानंतर चोरट्यांनी त्या घराशेजारी असलेल्या श्रीराम शिंदे यांच्या घराकडे आपला मोर्चा वळवित त्यांच्या घराचे कुलूप तोडून प्रवेश करत कपाटातील रोख रक्कम ▶▶ पान २ वर...



# अनिल जाधवर यांचा सेवापूर्ती सोहळा

बीड । प्रतिनिधी

प्राथमिक पदवीधर शिक्षक अनिल संपत्ती जाधवर हे दि. ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन दि. २९ मे रोजी करण्यात आले आहे. तरी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले.



शिक्षक अनिल जाधवर यांचा सेवापूर्ती सोहळा हॉटेल नीलकमल येथे सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आला असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिक्षण अधिकारी भगवान फुलारी तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारीआदित्य जीवने, प्रकल्प अधिकारी संगीता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, अप्पर निबंधक राजेश जाधवर, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस ▶▶ पान २ वर...

# अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती बीड जिल्हा अध्यक्षपदी शिवाजीराव हिंदोळे पाटील यांची निवड

बीड । प्रतिनिधी

बीड येथे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे प्रदश कार्यकारी अध्यक्ष मा.विनोद आप्पा इंगोले यांच्या निवासस्थानी आज व्यापक बैठकीचे आयोजन केले गेले होते, भष्टाचार निर्मुलन समिती चे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.प्रदिप पाटील खडापूरकर बाबा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील महिला सक्षमीकरण व महिलांचे विषयी प्रश्न सोडण्यासाठी महिला कार्यकर्त्यांची निवड करण्याचे



आदेश दिले गेले होते त्यानुसार महिलांच्या धडाडीच्या कार्यकर्त्या जेणेकरून महिलांचे संघटन व महिला विषयी आस्था प्रेम असणाऱ्या सौ.सारिका पाटील यांची महिला जिल्हाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली तर बीड जिल्हा अध्यक्ष मा.शिवाजीराव हिंदोळे, मराठवाडा विभागीय कार्यकारी अध्यक्ष सौ.रूपालीताई देशपांडे, बीड जिल्हा युवती जिल्हाध्यक्ष कु.समीक्षाताई वाघमारे , या वेळी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष मा.विनोद आप्पा ▶▶ पान २ वर...

# राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरणाच्या साथी मोहिमेचा व जिल्ह्यात शुभारंभ

## बालकांचे सर्वांगिण विकास आणि पुनर्वसन या वर आधारित मोहिम

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २१/०५/२०२५ रोजी वार बुधवार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड येथे मा.न्या. आनंद यावलकर जिल्हा प्रमूख व सत्र न्यायाधिश बीड यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या साथी मोहिमेचा जिल्हयात शुभारंभ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उद्घाटक म्हणुन न्या. आर. जी. बागडे. प्रभारी सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, तसेच





जिल्हास्तरीय बैठकीला उपस्थित तत्वशिल कांबळे, मिथुन जोगदंड, अशोक तांगडे, किरण नन्नावरे अधिकार मित्र बीड, दत्ता बारगजे, शेळके पी.टी, संतोश गर्जे एनजिओ प्रतिनिधी, रंगनाथ राउत प्राथमिक शिक्षण आधिकारी, महेश त्रिंबकराव काकडे माध्यमिक शिक्षण आधिकारी आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण मार्फत देशातील दुर्लक्षित, बेघर, अनाथ किंवा रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण करून त्यांना आधार नोंदणीव्दारे अधिकृत ओळख प्रदान करण्यासाठी साथी मोहिम सुरू करण्यात आली आहे. ▶▶ पान २ वर...

# लोकलढा आंदोलनांची बाजू एकनाथ शिंदेकडे ताकदीने मांडू: बाळासाहेब किसवे

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मौजे तांदळा येथे जायकवाडीच्या पाण्यासाठी आमरण उपोषण सुरु आहे. या उपोषणाला शिवसेना प्रदेशाध्यक्ष ओबीसी सेल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी महामंडळाचे उपाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन लोकलढा आंदोलकांची, उपोषणकर्त्यांची माहिती घेऊन हा प्रश्न महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडे ताकदीने मांडू असे आश्वासन

## उद्धव मडके यांचा शासन दरबारी पूर्ण ताकदीने पाठपुरावा सुरू



उपोषणकर्त्यांना दिले आहे. उपोषणकर्त्यांशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या पि.ए. शी फोनवरून संभाषण करून दिले.

जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून आंदोलन सुरू आहे.मात्र अद्यापही या शेतकऱ्यांची शासनाकडून मनावा तशी दखल घेतली जात नसल्याने मौजे तांदळा येथे अजय पाटील साळुंखे यांनी आमरण उपोषणाला बसले आहेत.उपोषणाच्या ▶▶ पान २ वर...

# हाथी चले बाजार..कुत्ते भोके हजार..

## सामान्य कार्यकर्त्याला कस जपाव हे शिकाव फक्त बाजीराव दादाकडून-रुग्णसेवक शरद झोडगे

बीड । प्रतिनिधी

दोन दिवसापूर्वी बीड मधे सामाजिक न्याय मंत्री संजयजी सिरसाट साहेब आले असता,युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक आणि युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या माध्यमातून व मंत्री संजयजी सिरसाट यांच्या हस्ते ४ निष्ठावंत यवसैनिकाना गाड्या गिफ्ट देण्यात आल्या.ही बातमी समजतात काही जळाऊ,गल्लीतही ओळख नसणाऱ्या काही पदाधिकाऱ्याच्या पोटात दुखायाला लागले व शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या बाजीराव दादा वर टीका करू लागले,माझ त्याना एवढच म्हणणं आहे की आधी तुम्ही स्वतःच कर्तुत्व सिद्ध करा आणि बाजीराव दादा वर टीका



करा,बाजीराव चव्हाण यांनी अनेक वर्षापासून युवकांची फळी निर्माण केली आहे व जोडलेल्या युवासैनिकाच्या अडचणी जाणून त्या सोडवण्याचं प्रयत्न केला आहे ▶▶ पान २ वर...

# पत्रकारांना धमकी देणाऱ्या आ.बाबुराव कदमांवर गुन्हा दाखल करा –अशोक होळकर

बीड । प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील पत्रकार संजय सुर्यवंशी यांना बातमी का छापली म्हणत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याचे धमकी देणाऱ्या आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष अशोक होळकर यांनी केली आहे , पत्रकारांवर दबाव टाकून आवाज दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्या आमदारांचा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ बीड



शाखेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे .दैनिक देशोन्नती तालुका प्रतिनिधी तथा मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष यांना दिनांक २२ मे २०२५ रोजी निवधा तळणी सर्कल मधील २५ गावे २५ तासांपासून अंधारात या मथळ्या खाली वृत्त प्रकाशित केले वास्तविक पाहता या बातमीत आमदार बाबुराव कदम कोहळीकर ▶▶ पान २ वर...

# केशवराव घिगे यांची शिवसेनेच्या जिल्हा सहसंघटक पदी निवड

## २४ मे रोजी बीडच्या कार्यक्रमात ना. संजय शिरसाट यांच्या हस्ते दिले नियुक्ती पत्र

**गेवराई । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार संजय मोरे शिवसेना सचिव यांनी बीडच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर केल्या असून यामध्ये माऊली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष केशवराव घिगे यांची जिल्हा सहसंघटकपदी निवड करण्यात आली असून बीड येथे झालेल्या कार्यक्रमात ना. संजय शिरसाट यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या निवडीबद्दल त्यांचे जिल्हाभरातून अभिनंदन होत आहे.



दरम्यान केशवराव घिगे त्यांच्या रूपाने बीड जिल्ह्यातील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात तळमळीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी न्याय दिल्याचे दिसून येत आहे.

दि.२४ मे रोजी बीड येथे झालेल्या कार्यक्रमात सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाट यांच्या हस्ते या सर्व पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देऊन शिवसेना पक्ष वाढीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मराठवाडा संपर्क प्रमुख पटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्क प्रमुख बापूसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिल ▶▶ पान २ वर...

# गेवराई येथील नगरपरिषदच्या जलतरण तलावातील सुरक्षा रामभरोसे

## जलतरण तलाव खेळतो चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगरपरिषदच्या जलतरण तलावात आर्या वावरे ही चिमुकली स्विमिंग करत असताना पाण्यामध्ये तिच्या पायाला गंभीर दुखापत झाली व तेथील ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी उडवा उडवी ची उत्तर देत हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या प्रकरणाकडे सीओ यांनी लक्ष घालून ठेकेदाराला समज द्यावी अशी मागणी पालकांकडून होत आहे.

गेवराई नगर परिषद ने जलतरण तलावाचे टेंडर काढून ठेकेदाराला दिलेले आहे. हा ठेकेदार स्विमिंग साठी येणाऱ्या मुले व पालक यांच्याकडून फी वसूल करतो परंतु ज्या सुरक्षा व सुविधा आहेत त्या मात्र देत नाही. या जलतरण तलावामध्ये आर्या अमोल वावरे वय १० वर्ष चिमुकली गुरुवार रोजी स्विमिंग करत असताना तिच्या पायाला दुखापत झाली यावेळी तेथील ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी त्या मुलीला ताबडतोब दवाखान्यात घेऊन जायला पाहिजे होते परंतु, त्यांनी तिच्या पायाला मलम पट्टी लावली व तिच्या पालकांना फोन करून सांगितलं की तुमच्या मुलीच्या पायाला छोटीशी दुखापत झाली. ज्या वेळेस अमोल वावरे तिथे आले त्यांनी मुलीला पाहिलं ▶▶ पान २ वर...

# युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांच्या वतीने बीड शहरात १०१ झाडांची लागवड



बीड । प्रतिनिधी

उन्हाळ्यात बीडचा पारा ४४ अंशावर गेल्याने नागरिकांच्या जिवाची लाही-लाही झाली. युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांनी तेव्हाच जिल्ह्यात वृक्षलागवड करण्याचा निर्णय घेतला होता. मे महिन्यात शेवटच्या आठवड्यात चांगला पाऊस पडल्याने त्यांनी चिंच,नारळ,आंबा,जाम,लिंब,वड, पिंपळ यासह सावली, फळ देणारे आणि वर्षानुवर्ष टिकणारे झाडे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांनी लावले. या उपक्रमाबद्दल यांचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा आहे. वृक्ष कमी झाल्याने त्यात अणखी भर पडली. प्रत्येकानी किमान दोन झाडे लावले पाहिजेत असे फक्त सोशल मीडियावर सेट्स ठेवले जाते. प्रत्यक्षात मात्र कृतीत ते उतरत नाही. मात्र युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव कसलाही मुहूर्त, कोणतेही कारण, कशाचेही औचित्य न साधता एक सामाजिक उपक्रम राबवला आहे. त्यांनी त्यांनी चिंच,नारळ,आंबा,जाम,लिंब,वड, पिंपळ हे झाडे लिंबाजी जाधव, महादेव मतकर (शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख) विलास मस्के, फुलचंद नेवाळे, प्रसाद चव्हाण, कृष्णा जाधव, सचिन गाडे, गणेश नेवाळे, विश्वनाथ जाधव, रामदास कदम यांच्या उपस्थितीमध्ये लावले.

**लावलेले प्रत्येक झाड जगवणार**

आम्ही लावलेले ▶▶ पान २ वर...